ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख १ फेब्रुवारी, १९५६ | अंक ५

## विविध माहिती

**रशिआकडून गहूं मिळणार**—गेल्या वर्षी भारताच्या निरनिराळ्या भागांत महापूर आल्यामुळें धान्याच्या उत्पादनांत घट होण्याचा संभव आहे. ही घट अंशतः भरून काढण्यासाठी मदत म्हणून रशिआनें भारताला २०,००० टन गहूं विकत देण्याचें ठरविलें आहे. रशिआ आपल्याच बोटींतून गहूं भारतीय बंदरांत आणील.

**कातडी कमावण्याचा ग्रामोद्योग**—पंजाब, मध्यप्रदेश, बिहार, हैद्राबाद आणि मध्यभारत ह्या राज्यांतील कातडी कमावण्याच्या ग्रामोद्योगाच्या धंद्याला मदत म्हणून व कर्ज म्हणून भारतीय सरकारनें १०,३३,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. अखिल भारतीय ग्रामोद्योग संघालाहि ह्याच धंद्यासाठी वरील रकमेंतून पैसे मिळणार आहेत.

**भारतीय रेल्वेसाठी साहित्य**—भारतीय रेल्वेजना लागणारें ८० लाख डॉलर किंमतीचें साहित्य पुरविण्याविषयीं अमेरिका व भारत ह्यांच्या दरम्यान पुढील सप्टेंबरपर्यंत करार होण्याचा संभव आहे. भारताला अमेरिकेकडून मिळणाऱ्या रेल्वे एंजिनांचा शेवटचा हप्ता लवकरच धाडण्यांत येणार आहे. १,००० मालवाहू डबेहि भारताला मिळावयाचे आहेत.

**उत्तर प्रदेशांत सिंहांची वसाहत**—जंगली प्राण्यांची राखण करण्यासाठी कार्य करीत असलेल्या बोर्डानें उत्तर-प्रदेशांतील एका अरण्याची सिंहांच्या नव्या वसाहतीसाठीं निवड केली आहे. विंध्यप्रदेश राज्यांत आणि म्हैसूर राज्यांत सिंहांची वसाहत करण्याचा पूर्वी विचार झाला होता उत्तर प्रदेशांतील जंगलांत ५-६ सिंहांचा गट नेऊन ठेवण्यांत यावा अशी सूचना बोर्डानें केली आहे.

**जगांतील तांदुळाचें उत्पादन**—१९५५-५६ ह्या सालीं जगांत तांदुळाचें उत्पादन सुमारें १५,९४,००,००० टन होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. गेल्या वर्षीच्या हंगामांतहि तांदुळाचें उत्पादन जवळ जवळ इतकेंच झालें होतें. १९५५ च्या पहिल्या नऊ महिन्यांत तांदुळाची झालेली निर्यात ह्याच कालांतील पूर्वीच्या वर्षाच्या निर्यातीपेक्षा थोडी अधिक आहे.

**सहकारी चळवळीचा विकास**— सहकारासंबंधीच्या शिक्षणाचा विचार करणाऱ्या मध्यवर्ती बोर्डानें असा अंदाज केला आहे कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत सहकारी चळवळीचा विकास करण्यासाठी सरकारी व बिगर-सरकारी अशा २०,००० लोकांना शिक्षण देऊन तयार करावें लागेल. शिक्षणाचें स्वरूप तात्विक व व्यावहारिक, दोन्ही तऱ्हेचें असावें असें बोर्डाचें मत आहे.

**३२,००० एकरांचें शेत**—३२,००० एकरांचे मोठें शेत स्थापन करण्यासाठी रशिआनें भारतीय सरकारला तांत्रिक मदत व शेतीचीं अवजारें देण्याचें ठरविलें आहे. भारतीय औद्योगिक प्रदर्शनांत रशिआनें मोठें यंत्रचलित नांगर व इतर आधुनिक शेतीचीं अवजारें ठेवलीं होतीं. तीं सर्व सामुग्री भारताला देऊं करण्यांत आली आहे.

**लंडनमध्यें भारतीय पद्धतीचें होटेल**—ब्रिटनच्या पार्लमेंटचे एक हुजूरपक्षीय सभासद श्री. स्टेवर्ड ह्यांनीं लंडनमध्यें भारतीय पद्धतीचें रेस्टॉरंट चालविलें आहे. त्याचें नांव 'वीरस्वामी' असें असून श्री. स्टेवर्ड ह्यांनीं ते २० वर्षांपूर्वी काढलेलें आहे. भारतीय पद्धतीच्या अन्नाविषयीं व वाढपाविषयीं अधिक माहिती करून घेण्यासाठी ते भारतांत आले होते.

**तिरुपता येथें सुताची गिरणी**—तिरुपती येथें खाजगी भांडवलाची एक सुताची गिरणी काढण्यांत येणार असून तिला मध्यवर्ती सरकारची मान्यताहि मिळाली आहे. गिरणीमध्यें १२,००० चात्या बसविण्यांत येतील. गुंटकल येथेंहि दोन सुताच्या गिरण्या काढण्याचें घाटत आहे. गिरण्यांसाठी लागणारें भांडवल कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांकडून जमविण्यांत येणार आहे.

**आंध्र सरकारची घरबांधणी**—१९५६-५७ ह्या आर्थिक वर्षांत आंध्र सरकार शहरांतील घरबांधणीवर २० लाख रुपये आणि ग्रामीण भागांतील घरबांधणीवर १,००,००० रुपये खर्च करणार आहे. इतर राज्यांच्या मानानें आंध्र सरकारनें औद्योगिक कामगारांना राहण्यासाठी घरें बांधण्याच्या कामीं बेताचेंच कार्य केलेलें आहे.


**पश्चिम जर्मनींतील पोलादाचें उत्पादन**—पश्चिम जर्मनींतील पोलादाच्या कारखान्यांनीं १९५५ सालीं २·१३ कोटी टन कच्च्या पोलादाची निर्मिति केली. १९५४ सालाच्या उत्पादनाशीं तुलना करतां उत्पादनांत २२·४ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून येतें. पोलादाच्या उत्पादनांत पश्चिम जर्मनीचा अनुक्रम अमेरिका व रशिआ ह्यांच्यानंतर लागतो.

**जपानच्या लोकसंख्येची वाढ**—गेल्या पांच वर्षांत जपानच्या लोकसंख्येंत ७·३ टक्क्यांनीं वाढ झाली असल्याचें गेल्या ऑक्टोबरमध्यें करण्यांत आलेल्या शिरगणतीवरून दिसून येतें. त्याचप्रमाणें, जपानमधील सहा मोठ्या शहरांत ग्रामीण भागांतून स्थलांतर करून येणाऱ्या लोकांची वाढत्या प्रमाणांत आवक होत असल्याचेंहि दिसून आलें. लोकसंख्येविषयींचा हा अहवाल दिल्लींतील जपानी वकिलातीनें प्रसिद्ध केला आहे.

## लवाद् हुकुमनाम्याची बजावणी

लेखक : स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., पुणें

मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या सन १९२५ च्या कायद्यान्वयें उपस्थित झालेल्या तंट्याचा निर्णय करण्याकरितां रजिस्ट्रार्स नॉमिनींच्या नेमणुका केलेल्या असतात. ह्या नेमणुका प्रतिवर्षी मे. रजिष्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीजमार्फत होत असतात व अशाप्रकारें नेमणुका केलेल्या नॉमिनींच्या याद्या दरवर्षी मुंबई सरकारचे गॅझेटांत प्रसिद्ध होतात. सदरचे गॅझेटांत नॉमीनीचें नांव, पत्ता व त्यांस दिलेलें अधिकारक्षेत्र ह्या बाबींचा त्यांत उल्लेख केलेला असतो. रजिस्ट्रार्स नॉमीनीकडे निर्णयासाठीं पाठविलेले लवाद् दावे आलेवर रजिस्ट्रार्स नॉमीनी अगर संबंधी पक्षकारांनीं लवादबोर्डाची मागणी केल्यास बोर्डाकडून अशा तऱ्हेच्या दाव्यांचा निर्णय केला जातो व शेवटीं हुकुमनामा होतो. ह्या हुकुमनाम्यासच 'लवाद् हुकुमनामा' अशी संज्ञा दिलेली आहे. दाव्यांच्या सर्व कागदपत्राबरोबर अशारीतीनें केलेले हुकुमनामे असिस्टंट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज यांचेकडे पाठवले जातात. दिवाणी कोर्टांत तयार होणारे हुकुमनामे संबंधी पक्षकारांस वाटल्यास तावडतोब बजावणीस काढतां येतात. त्या कामीं पक्षकारांना सदरच्या हुकुमनाम्यावर दरखास्त अर्ज देवून त्यांची बजावणी दिवाणी कोर्टामार्फत करतां येते. लवाद् हुकुमनाम्यांची बजावणी करणेसाठी मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे कायद्यांत नमूद केलेप्रमाणें विशिष्ट तंत्राचा अवलंब करावा लागतो. लवाद् हुकुमनाम्याची बजावणी दिवाणी अगर रेव्हेन्यु यांपैकीं कोणत्याहि कोर्टांत करणेची तरतूद सदरचे कायद्यांत केलेली आहे. पक्षकारांस वाटल्यास त्यानें लवाद् हुकुमनाम्याची बजावणी दिवाणी कोर्टांत करावी अगर रेव्हेन्यु कोर्टांत करावी. परंतु अशातऱ्हेनें बजावणी करावयाचे अगोदर मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे कायद्याखालील कलम ५९ यांत नमूद केलेप्रमाणें हुकुमनाम्याची बजावणी करणाऱ्या पक्षकारांस प्रथम रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज यांचेकडोन सर्टिफिकेट घ्यावें लागतें तोंपर्यंत त्यांस लवाद् हुकुमनाम्याची बजावणी करतां येत नाहीं. अशा तऱ्हेचें सर्टिफिकेट मिळवणेसाठीं ठराविक फॉर्मवर पक्षकारांस अर्ज करावा लागतो व तदनंतर असिस्टंट रजिस्टार हे त्या अर्जान्वयें सर्टिफिकेट देणेची व्यवस्था करतात. सदरचे अर्जांत लवाद् हुकुमनाम्याची बजावणी कोणत्या कोर्टांतून करावयाची आहे याचा उल्लेख करावा लागतो. लवाद् हुकुमनाम्याच्या बजावणीचें सर्टिफिकेट रजिस्टारसाहेब यांचेकडोन आलेवर तो लवाद् हुकुमनामा बजावणीस पात्र होतो व त्यानंतर बजावणी करणेसाठी पक्षकारांस दिवाणी कोर्टांत दरखास्तअर्ज दाखल करतां येतो अगर रेव्हेन्यु कोर्टाकडे त्याबाबत अर्ज करून हुकुमनाम्याची बजावणी करून मागतां येतें. दिवाणी कोर्टांत लवाद् हुकुमनाम्याची बजावणी करावयाची झाल्यास सिव्हिल प्रोसीजर कोड ऑर्डर २१ रूल यांत नमूद केलेप्रमाणें दरखास्त देऊन बजावणी कोणत्या प्रकारें करावयाची याचा स्पष्ट उल्लेख करावयास पाहिजे आहे. सदरचे दरखास्त अर्जाबरोबर लवाद् हुकुमनामा, सर्टिफिकेट, शेतजमिनीबाबत बजावणी असल्यास ७।१२ चे उतारे व सिटी सर्व्हे हद्दींत असलेल्या स्थावर मिळकतीबाबत सिर्टिसर्व्हेचे उतारे दाखल करावें लागतात. लवाद् हुकुमनाम्याची बजावणी वर उल्लेख केलेप्रमाणें रेव्हेन्यू कोर्टामार्फतहि करतां येते. व त्या कामीं रीतसर अर्ज मे. कलेक्टरसाहेब यांचेकडे करून हुकुमनाम्याची बजावणी करतां




येते. दिवाणी कोर्टामार्फत लवाद् हुकुमनाम्याची बजावणी करावयाची झाल्यास मे. रजिस्टार सो यांनीं दिलेल्या सर्टिफिकेटाच्या तारखेपासून मुदत मोजावी लागते. सिव्हिल प्रोसीजर कोड कलम ४८ अन्वयें सदरच्या लवाद् हुकुमनाम्याची बजावणीची मुदत १२ वर्षांची आहे. मुंबई को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांच्या कायद्याखालील कलम ५९ अन्वयें सर्टिफिकेट दिलेल्या तारखेपासून ही कालमर्यादा १२ वर्षांची आहे. व मुदतीच्या कायद्याचें आर्टिकल १८२ अन्वयें ३ वर्षांचे आंत स्टेप-इन-एड घ्यावी लागते. उदाहरणार्थ आपण असें समजू कीं लवाद् हुकुमनामा तारीख ४-२-५० रोजीं झालेला आहे व कलम ५९ अन्वयें पक्षकारांस बजावणीचें सर्टिफिकेट ता. १८-४-५० रोजीं दिलेलें आहे. दिवाणी कोर्टांत सदरच्या हुकुमनाम्याची बजावणी करावयाची झाल्यास संबंधी पक्षकारास १७-४-५३ चे आंत दरखास्त दाखल करावयास पाहिजे आहे. त्यानंतर सदरची दरखास्त मुदतींत दिलेली नसलेमुळें मुदतीच्या कायद्याचें आर्टिकल १८२ अन्वयें मुदतीबाहेर गेलेली असलेमुळें रद्द होतें. दिवाणी कोर्टांत बजावणी करावयाची झाल्यास लवाद् हुकुमनाम्याचें जीवन १२ वर्षांचें धरलेलें आहे. त्या कालानंतर अशा हुकुमनाम्याची बजावणी दिवाणी कोर्टांत करतां येत नाहीं. रेव्हेन्यू कोर्टाकडे बजावणीसाठी पाठविलेल्या लवाद् हुकुमनाम्यास मुदतीची अट नाहीं. व सर्टिफिकेटाचे तारखेपासून तीन वर्षांचे आंत बजावणी केलीच पाहिजे असें बंधनहि नाहीं. ह्या ठिकाणीं असा एक प्रश्न उपस्थित होतो कीं पक्षकारास एकाद्या लवाद् हुकुमनाम्याची बजावणी एकाच वेळीं दिवाणी व रेव्हेन्यू कोर्टांत करतां येईल काय ? ह्याबाबत मुंबई सरकारचे रेव्हेन्यू खात्यानें ता. १३-२-१९३१ चा नं. ६२८७।२८ चा रेझोल्युशन केलेला असून त्याबाबत असें ठरविलें आहे कीं मे. रजिस्टारसाहेब यांनीं कलम ५९ अन्वयें द्यावयाच्या सर्टिफिकेटाचे वेळीं कोणत्या कोर्टामार्फत लवाद् हुकुमनाम्याची बजावणी करावयाची आहे हें निश्चित ठरवून घ्यावें व मगच संबंधी पक्षकारांस लवाद् हुकुमनाम्याचें बजावणी सर्टिफिकेट घ्यावें.

# अर्थ

बुधवार, ता. १ फेब्रुवारी, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## वाढत्या लोकसंख्येचा धोका व अन्नाचा पुरवठा

वाढत्या लोकसंख्येचा धोका किती गंभीर स्वरूपाचा आहे ह्यासंबंधी आंकडेवारीवर आधारलेली विश्वसनीय माहिती देणारा एक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. सध्यां जगापुढें असणाऱ्या भीतिप्रद अशा प्रश्नांत हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा असा आहे. महायुद्ध झालें नाहीं तर जगांतील लोकसंख्या दरसाल ३·४ कोटींनीं वाढत जाईल. सध्यांच अशी परिस्थिति आहे कीं जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी दोन-तृतीयांश लोकांना आरोग्यरक्षणाला पुरेल इतकेंहि अन्न मिळत नाहीं, व पुष्कळशा लोकांना नेहमींच अर्धपोटीं रहावें लागतें. सर्व लोकांना पुरेसें अन्न द्यावयाचें म्हटलें तर आतांच्या आतांच अन्नपुरवठ्यांत २५ टक्के वाढ करणें शक्य झालें पाहिजे. पण ही गोष्ट एखादा चमत्कार झाल्याशिवाय अशक्यप्रायच आहे; आणि नंतरहि दरवर्षी १·३ टक्क्यांनीं अन्नाचा पुरवठा वाढला पाहिजे; तरच खाणाऱ्या तोंडाचें समाधान करतां येईल. चमत्काराची बाब सोडून दिली, तर असा हिशेब आहे कीं दरवर्षी अन्नाच्या पुरवठ्यांत २ टक्के वाढ झाली तरी वाढत चाललेल्या लोकसंख्येला पुरेसें अन्न देण्यास ३० वर्षें लागतील. पण दरवर्षी उत्पादनांत २ टक्के वाढ होणें हीच गोष्ट मुळांत चमत्काराच्या स्वरूपाची आहे. जगांतील बहुतेक भागांत जननसंख्येवर नियंत्रण घालण्यांत येत नाहीं. उलटपक्षीं, मृत्यु टाळण्याच्या बाबतींत मात्र शास्त्रीय प्रगति चांगली झाली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या योगक्षेमाला लागणारें अन्न, कच्चा माल आणि औद्योगिक शक्ति ह्यांचें पुरेसें उत्पादन करतां येईल काय ? अहवालांत असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं, येत्या तीस-चाळीस वर्षांत खनिजें, शक्ति, पाणी, रसायनें व लाकूड ह्यांचें उत्पादन पुरेशा प्रमाणांत करतां येईल. पण, योग्य वेळीं व योग्य ठिकाणीं पुरेसें अन्न पुरविणें मात्र जास्त जास्त अवघड होत जाणार आहे.

सध्यांच जगाच्या कांहीं भागांत लोकसंख्येची अतोनात दाटी झालेली आहे. जपानची लोकसंख्या ८·७ कोटी आहे, व ती दरसाल १२ लाखांनीं वाढत आहे. जपानमध्यें दरडोई अवघी ०·१५ एकर जमिनीच पिकाखालीं आहे. परदेशांत जाऊन स्थायिक होण्याची फारशी शक्यताहि जपानी लोकांना सध्यां उपलब्ध नाहीं. दरवर्षी सुमारें १० लाख गर्भपात अधिकृतरीत्या करण्यांत येतात. ते करण्यांत आले नाहींत तर जपानची लोकसंख्या दरसाल सुमारें २४ लाखांनीं वाढेल. भारताची लोकसंख्या दरसाल ५० लाखांनीं वाढत आहे. बहुतेक भारतीयांचें रहाणीचें मान अगदीं निकृष्ट आहे. इजिप्तची लोकसंख्या दरसाल २·३ टक्क्यांनीं वाढत आहे. इजिप्तमध्यें प्रत्येक चौरस मैल जमिनीवर १,५०० लोकांचा बोजा आहे. सीलोनमध्यें डी. डी. टी. रसायन मारण्यास सुरवात झाल्यापासून हिंवतापाचें आजिबात उच्चाटन झालें आहे. सीलोनची लोकसंख्या दरसाल २·७ टक्क्यांनीं वाढत आहे. अमेरिकेंत गरजेपेक्षा अधिक धान्याची पैदास होत आहे. तेव्हां अमेरिका इतर जगाला ह्या बाबतींत किती मदत करूं शकेल, असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. पण बाहेरच्या देशांना अन्नाचा पुरवठा करण्याच्या बाबतींत अगर परदेशीय लोकांना अमेरिकेंत स्थायिक होऊं देण्याच्या बाबतींत अमेरिका फारशी मदत करूं शकणार नाहीं असें अहवालांत म्हटलें आहे. सुजाण लोकांनीं लोकसंख्या व अन्नाचें उत्पादन ह्या संबंधित प्रश्नांचा विचार करावा म्हणून माहिती पुरविण्याचा अहवालाचा हेतु आहे व तो चांगला साध्य झाला आहे.

---

## साखरेसंबंधीच्या तज्ज्ञांची परिषद

दिल्ली येथें साखरेच्या धंद्यासंबंधीच्या आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची परिषद भरली होती. साखरेचा धंदा हा भारताच्या मोठ्या धंद्यांपैकी दुसऱ्या क्रमांकाचा धंदा असून १९६० नंतर भारतामधून साखरेची निर्यात करण्याइतका तो प्रगत होईल, असा अंदाज आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उसाची लागवड आणि साखरेची निर्मिति अधिक करण्यासाठी साखरेचे कारखाने भारताच्या उष्ण कटिबंधांत काढण्याचें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. ह्या भागांत उसाची लागवड करण्यांत आली तर दर एकरीं ५० ते ६० टन उत्पादन करतां येतें. तथापि भारतामधील कारखान्यांना अद्याप एका अडचणीला तोंड द्यावयाचें आहे. क्यूबा अगर हवाई ह्या भागांतील साखर कारखान्यांत उसापासून साखरेचा जितका उतारा निघतो तितका भारतीय कारखान्यांतून निघूं शकत नाहीं. उसाची लागवड करण्याची पद्धति सुधारल्याशिवाय उतारा वाढणार नाहीं, असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. साखरेचा उतारा अधिक पडूं लागल्यास एकूण उत्पादनांत वाढ होऊन भारताला आपली सर्व गरज भागवितां येईल. देशांतील साखरेची गरज दरसाल सुमारें २२·५ लाख टन आहे. १९३२ सालीं ह्या धंद्याला संरक्षक जकातीचा आधार देण्यांत आला. तेव्हांपासून त्याची एकसारखी प्रगति होत आहे. देशांतील साखरेचा खप वाढतच जाणारा असल्यामुळें साखरेच्या धंद्याचा विस्तार करणें योग्यच आहे. साखरेच्या कारखान्यासाठी लागणारी सर्व यंत्रसामुग्री मात्र अद्याप देशांतच तयार होऊं शकत नाहीं. प्रमुख असें कांहीं साहित्य परदेशांतूनच आयात करावें लागतें. जरूर ती यंत्रसामुग्री मिळविण्यासाठी आतां ब्रिटनवरच अवलंबून रहाण्याचें कारण उरलेलें नाहीं; इतर देशांतूनहि ती मिळूं शकते.

---

**चित्रपटाची सहकारी संस्था**— कोल्हापूर सिने-इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह सोसायटी ह्या संस्थेनें सहकारी तत्त्वावर चित्रपटांची निर्मिति करण्याचें ठरविलें आहे. प्रत्यक्ष कार्याला ह्या महिनाअखेर प्रारंभ होईल. चित्रपट-निर्माते, वितरक आणि स्थानिक चित्रपटगृहांचे मालक, ह्या सर्वांचें सहकार्य संस्थेला मिळणार आहे. संस्थेचें बोधचिन्हहि ठरविण्यांत आलें आहे.

### व्हिक्टोरिया क्रॉस

'व्हिक्टोरिया क्रॉस' हें पदक बक्षीस देण्यास १०० वर्षांपूर्वी प्रारंभ झाला. त्याचा शतसांवत्सरिक उत्सव लवकरच ग्रेट ब्रिटनमध्यें साजरा होणार आहे. तिन्ही दलांची त्यासाठी एक समिति नेमण्यांत आली असून, मिलिटरी सेक्रेटरी ले. जनरल सर कॉलिन कॅलेंडर हे तिचे अध्यक्ष आहेत.

२९ जानेवारी, १८५६ रोजीं व्हिक्टोरिया राणीनें एक हुकूम काढून ह्या पदकाची योजना केली, पण १८५४ पासूनच्या शौर्यकृत्यांनाहि तें पदक मिळावें, असें ठरविण्यांत आलें. जगांतील सर्वांत प्रसिद्ध अशा ह्या पदकाचा मान आतांपर्यंत १३७४ लोकांना मिळाला आहे. त्यांत ११८ नाविक खलाशी, ८६७ लष्करी सैनिक व ३१ वैमानिक ह्यांची गणना होते. ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशांच्या ३३१ लोकांना हें पदक मिळालें आहे. एकूण १३७४ लोकांपैकीं सुमारें ४०० लोक हें पदक छातीवर लावण्यास आज हयात आहेत.

हिंदी सैन्यापैकीं १११ जणांना व्हिक्टोरिया क्रॉस मिळालेला आहे, पण काळा-गोरा भेद मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळें शौर्याच्या कृत्यालाहि त्याची झळ लागत असे.

आतांपर्यंत कोणत्याहि स्त्रीला व्हिक्टोरिया क्रॉस मिळालेला नाहीं, पण त्यांना तो मिळण्याची बंदी मात्र नाहीं.

### त्रावणकोर-कोचीन मधील बँकिंगसाठी चौकशी कमिशनची नेमणूक

त्रावणकोर-कोचीन राज्यांतील बँकांच्या विशिष्ट प्रश्नांची तपशीलवार पहाणी करण्यासाठी भारत सरकारनें एक कमिशन नेमलें आहे. बँकअवार्ड कमिशननें आपल्या रिपोर्टांत अशा चौकशीची आवश्यकता प्रतिपादन केलेली होती. बँकनोकरांच्या अखिल भारतीय संस्थांत ज्या बँका सामील नव्हत्या, त्यांच्यांतील नोकरांच्या विषयीं हें कमिशन चौकशी करील. त्रावणकोर-कोचीन मधील बँकिंगची पहाणी करणें आणि त्या राज्यांत स्थापन झालेल्या बँकांची स्वतंत्रपणें उपयुक्त कार्य करीत रहाण्याची पात्रता अजमावणें, हीं कामेंहि कमिशन करील. बँकिंगच्या संस्थांस मजबुती कशी आणतां येईल, बँकिंगची पुनर्रचना कशी करावी, कोणत्या बँकांचें एकत्रीकरण करावें, कोणत्या बँका बंद कराव्या, इत्यादि बाबतींत कमिशन शिफारसी करील. कमिशनच्या कामास तावडतोब प्रारंभ होईल.

**कॅन्सरसंबंधी संशोधन**—कॅन्सरवरील उपचारविषयक संशोधन करण्यासाठी स्वीडन व अमेरिका ह्या देशांनीं सहकार्य करण्याचें ठरविलें आहे. ह्या कार्यासाठी दोन्ही देशांतील वैद्यकीय संशोधकांची अदलाबदल करण्यांत येणार आहे. संशोधनाचा कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी उभयतां देशांनीं मिळून १०,००० डॉलर्सची रकम खर्च करण्याचें ठरविलें आहे.

**तंबाखूच्या निर्यातीसाठी कौन्सिल**—तंबाखूची निर्यात वाढविण्यासाठी भारतीय सरकार टोबॅको एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलची स्थापना करणार आहे असें समजतें. देशांत तंबाखूचा विपुल सांठा पडून असल्यामुळें परदेशांत तंबाखू खपविण्याची शक्यता अजमावण्यासाठी सरकारनें अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. फक्त गुजरातमध्येंच ९,३६,०००,००० पौंड तंबाखू पडून आहे.

५०
वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

## NOTICE

### The Bank of Maharashtra Limited

Notice is hereby given that the twentyfirst Ordinary General Meeting of the Share-holders of the Bank of Maharashtra Ltd., will be held at the registered office of the Bank, 898, Sadashiv Peth, Poona-City on **Saturday** the **25th February, 1956 at 4 p. m. (S. T.)** to transact the following business:—

(1) To receive and consider the Balance sheet, the Profit and Loss Account and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December, 1955.

* (2) To declare a Dividend.

(3) To elect five Directors in the places of the retiring Directors who are eligible for re-election.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To transact such other business as may be allowed by the Chairman.

Poona City, 25th January, 1956.

By order of the Board,
**C. V. JOAG,**
*Manager.*

*N. B.*:—The Share Transfer Books of the Bank will be closed from the 18th day of February, 1956 to the 25th day of February, 1956, both days inclusive.

* The Dividend, when declared will be payable on and after Saturday, 3rd March, 1956 and the Dividend Warrants will be posted to the registered addresses of the shareholders. (Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.)

## सावकारी नियंत्रणाचा सोपा मार्ग

### बँकांच्या साहाय्यानें नियमनाची सूचना

लेखक :
स. वा. दातार, बी. एस्सी., एलएल. बी., वकील, पुणें

सोयीसाठी म्हणून एकादी योजना करावी परंतु तिच्यांतून गोयीऐवजीं गैरसोयच अधिक निर्माण व्हावी, असेंच अलिकडील कांहीं कायद्यांबाबतचे अनुभव आहेत. रस्त्यावर रहदारी वाढली तर तिचें सुव्यवस्थित मार्गदर्शन करण्याऐवजीं त्या रहदारीस अजिबात बंदी घालून टाकावी, त्यासारखेसुद्धां अलीकडील कांहीं कायदे आहेत. सावकारी नियंत्रण कायदा हा सुद्धां असाच मोठा विचित्र कायदा आहे. जी गोष्ट मुळांत गुन्हेगारीच्या स्वरूपाची नाहीं; उलटपक्षीं निदान प्रारंभीं तरी बरीचशी उपकारकच आहे, ती दुसऱ्याच्या गरजेला अनुसरून पैसे देण्याची समाजोपयोगी बाब सावकारी नियंत्रण कायद्यानें गुन्हेगारीची ठरवून टाकली. शिवाय, वास्तविक ज्या लोकांच्या सावकारीवर नियंत्रण यावयास पाहिजे, ते तर खुशाल या कायद्यांतील पळवाटांचा फायदा घेऊन वागत आहेत; अडथळा आला आहे तो सर्वसामान्य माणसांना! व्याजबट्ट्याच्या अघोरी पाशांत गरजू रयतेला अडकवून तिचें रक्तशोषण करणाऱ्यांना या कायद्याचा अडथळा येत नाहीं; उलट या कायद्याच्या बुजगावण्याचा उपयोग करून कोर्टाबाहेर ही प्रकरणें मिटवावयाची आवश्यकता प्रतिपादून अधिकच जुलमी अटींवर सराईत लोकांची सावकारी अव्याहत चालू आहे.

सावकारी नियंत्रणाचे हेतु दोन: एक, कर्जाऊ दिलेल्या मूळ रकमेचा आंकडा फुगवला जाऊं नये; दुपटीचे दस्तऐवज लिहिले जाऊं नयेत व दुसरा, व्याजाची आकारणी जबर दरानें वा गफलतीनें न व्हावी व वसुलाचा हिशेब बरोबर ठेवला जावा. सावकारी नियंत्रण कायद्यानें तक्ते व अहवाल यांचें जंजाळ उभे करून व ते नियंत्रणाधिकाऱ्यांकडे दाखल करण्याची सक्ति करून परवाना घेऊन सावकारी करणारांना जादा मेहनतीचा व त्यावर खर्चाचा भुर्दंड पाडला असला, तरी सावकारी नियंत्रणाचे वरील हेतू हमखास साध्य झाले आहेत, अशी ग्वाही देतां येणार नाहीं.

सबब, सावकारी नियंत्रणाचा सोपा पर्याय येथें सुचवावयाचा आहे. आपल्या सांप्रतच्या अर्थरचनेंत कर्ज काढण्याची रयतेची गरज अद्याप संपलेली नाहीं. अशा स्थितींत कोणालाहि सहजासहजीं कर्जाऊ रकम देण्या-घेण्याचा व्यवहार करतां यावा, असा या नव्या कल्पनेमागील हेतु आहे.

आपल्याकडे बँका आतां सुस्थिर झाल्या असून आपले व्यवहार अधिकाधिक प्रमाणांत बँकांमार्फत होऊं लागले आहेत. ही गोष्ट निःसंशयय प्रगतीची असून, बँकिंगचा प्रसार होणें इष्टच आहे. सावकारी नियंत्रणाचे व सावकारीचे व्यवहार बँकांमार्फतच करण्यांत यावेत अशी याबाबतची सूचना आहे. कर्जाऊ रकम देण्या-घेण्याचा व्यवहार करावयाचा ठरवतांच धनको व ऋणको या दोन्हीं व्यक्तींनीं जरूर तो दस्तऐवज तयार करून आपल्या नजिकच्या इष्ट बँकेंत तो हजर करावा. तावडतोब त्यावर योग्य ते शेरे मारून त्या व्यवहाराचें स्वतंत्र खातें उघडून बँकेनें धनकोकडून कर्जाऊ रकम त्या खात्यांत जमा करावी व योग्य त्या नोंदी करून तिचा भरणा ऋणकोस द्यावा. पुढें ज्या ज्या वेळेस ऋणकोस कर्जापोटीं वसूल द्यावयाचा असेल, त्या त्या वेळीं त्यानें तो सदर बँकेंतील त्या खात्यांत भरावा. याबद्दल बँकेला योग्य त्या दरानें कमिशन मिळावें. पोस्टल बँकेमार्फतहि असे व्यवहार करतां यावेत. जेव्हां जेव्हां कोर्टांत या व्यवहारासाठीं दावा करावा लागेल, तेव्हां त्या दाव्यांत दस्तऐवजासोबत बँकेंतील खात्याचा उताराहि हजर करण्यांत यावा. ज्याप्रमाणें पावती शिवाय वसूल दिल्याची तक्रार सांगतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच रक्कम देऊनहि पावती न दिल्याची तक्रार या योजनेमुळें करतां येणार नाहीं. त्याबरोबरच वसूल घेणें वा न घेणें आणि दिलेल्या वसुलाची नोंद करणें, वा न करणें या गोष्टीहि धनकोच्या मर्जीवर राहणार नाहींत. कोर्टांत कब्जेभाड्याचा दावा लागला असतां भाड्याची रक्कम कोर्टांत भरण्याची जशी सुलभ सोय असते तशीच सोय बँकेमार्फत कर्ज घेण्याची व्यवस्था झाल्यास बँकेंतच वसूल भरण्याची सोय होईल आणि सावकारी नियंत्रण कायद्याखालील अधिकारी, त्यांच्या कचेऱ्या, परवाने व तक्ते, कोष्टकें, अहवाल, यांच्या फाइली हें सारें जंजाळ नाहींसे होऊन जनतेला खुलेपणानें व उजळ माथ्यानें आपल्या इष्टमित्रांना व भरंवशाच्या कुळांना कर्जाऊ रकमा देऊन त्यांची गरज भागवतां येईल वा त्यांच्या योजनांना आर्थिक मदत देतां येईल.

---

**दिल्लींत दारूबंदी होणार**—दिल्ली सरकारच्या समितीनें गेल्या ऑगस्टमध्यें शहरांत दारूबंदी करण्यांत यावी अशी शिफारस केली होती. आतां दिल्लीच्या कलेक्टरनें दारू विकण्याची परवानगी असलेल्या हॉटेलवाल्यांना अशी समज दिली आहे कीं, त्यांचे परवाने पुन्हां चालू न करण्यांत येण्याचा संभव आहे. परवाने फिरून चालू करण्यांत न आल्यास, १९५६ च्या मार्चनंतर दारू विकतां येणार नाहीं.

**अधिक प्रसूतीगृहांची सोय**—मध्यभारत सरकारनें राज्यांतील सर्व तहसिलांच्या ठिकाणीं प्रसूतीगृहांची सोय करण्याचें ठरविलें आहे. चालू असलेल्या प्रसूतीगृहांतील खाटांची संख्याहि वाढविण्यांत येणार आहे. ह्या योजनेसाठीं राज्य-सरकारला १६,५०,००० रुपये खर्च येईल. १९ नवीं प्रसूतीगृहें बांधण्यांत येणार असून ३५ प्रसूतीगृहांतील सोयी वाढविण्यांत येतील.

**इराणमधील अफूचें उत्पादन**—इराणमध्यें दरसाल ७०० ते १२०० टन अफूची निर्मिती होते व त्यापैकी कांहीं चोरट्या मार्गानें परदेशांत रवाना होतें. इराणमध्यें अफूचें व्यसन लागलेले १५ लाख लोक आहेत. ह्या व्यसनामुळें दरसाल ५,००० लोक आत्मघात करतात, १,००,००० लोक अल्पवयांतच मृत्यु पावतात आणि सुमारें ५०,००० मुलें निराधार बनतात, अशी माहिती इराणच्या आरोग्यमंत्र्यांनीं सांगितली आहे.

**शारीरिक शिक्षणाला प्रोत्साहन**—ग्रामीण भागांत शारीरिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठीं मध्य प्रदेश सरकारनें ५ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. राज्यांत ठिकठिकाणीं खेळांचीं मैदानें तयार करणें, त्यासाठीं आखाडे बांधणें आणि खेळांचे सामने भरविणें, ह्या कामासाठीं रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे. शिवाय, शारीरिक शिक्षण देणाऱ्या बिनसरकारी संस्थांना मदतहि देण्यांत येणार आहे.

**टयूब विहिरी खोदण्याचें यंत्र**—महागुजरात दुष्काळ-निवारक कमिटीनें टयूब विहिरी खोदण्याचें यंत्र विकत घेण्याचें ठरविलें आहे. यंत्रासाठीं २ लाख रुपये खर्चावे लागतील. ह्या यंत्राच्या साह्यानें गुजरातमधील दुष्काळी भागांत टयूब विहिरी खोदण्यांत येणार आहेत. गेल्या सहा वर्षांत गुजरातमध्यें अशा प्रकारच्या ४०० विहिरी खोदण्यांत आल्या, अशी माहिती एका सार्वजनिक कार्यकर्त्यानें जाहीर केली आहे.

## साखर यंत्रसामुग्रींचें उत्पादन

( लेखक : मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्याचे प्रमुख औद्योगिक सल्लागार, डॉ. ए. नागराज राव )

गेल्या कांहीं वर्षांत भारतांत साखर धंद्याच्या झपाट्यानें झालेल्या विकासामुळें साखर कारखान्यांतील यंत्रसामुग्रींचें देशांत उत्पादन करण्यास चालना मिळाली. उसाचा रस तापविण्याचें यंत्र, निर्वात काहिल्या, बाष्पीकरण यंत्र, क्रिस्टलायझर्स, बॅरोमेट्रिक, कंडेन्सर्स वगैरे महत्त्वाची यंत्रसामुग्री सध्यां निरनिराळ्या फर्म्स तयार करीत आहेत.

साखरेच्या यंत्रसामुग्रींचें उत्पादन करणारे सध्यां देशांत पुढील सहा प्रमुख कारखाने आहेतः—( १ ) इंडिअन शुगर ॲण्ड जनरल इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन, अंबाला, ( २ ) रिचर्डसन ॲण्ड क्रुडास लि. मुंबई, ( ३ ) वेरी ब्रदर्स, कलकत्ता, ( ४ ) आर्थर बटलर ॲण्ड को. लि. मुझफरपूर, ( ५ ) सारन इंजिनिअरिंग कं. लि., सारन आणि ( ६ ) पोर्ट इंजिनिअरिंग वर्क्स, कलकत्ता.

भारतांत १९५४ मध्यें १२,५९,७५० रु. किंमतीची यंत्रसामुग्री तयार झाली. १९५३ व १९५२ मध्यें अनुक्रमें ३,९८,००० रुपयांची व ३,९२,००० रुपयांची यंत्रसामुग्री तयार झाली होती. याच तीन वर्षांत अनुक्रमें ९१,९८,१४० रु., ६९,१४,२९० रु. व ६४,२४,२८० रु. किंमतीची यंत्रसामुग्री आयात झाली.

सध्यां या दिशेनें उत्पादनाची प्रवृत्ति निःसंशयपणें उत्तेजनपर असली, तरी आणखी विकासाची अत्यंत गरज आहे. साखर कारखान्यास लागणारी एकूणएक यंत्रसामुग्री अजूनहि एकहि भारतीय उत्पादक तयार करूं शकत नाहीं. क्रशिंग मिल्स व हाय स्पीड सेन्ट्रिफ्युगल्स यांसारखे महत्त्वाचे यंत्रभाग अद्यापहि येथें तयार होत नाहींत.

साखरेची उत्पादनशक्ति वाढविण्याच्या आपल्या योजना लक्षांत घेतां दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत प्रतिवर्षी आपणांस सुमारें २·५ कोटी रु. किंमतीची यंत्रसामुग्री लागेल असा अंदाज आहे. त्यापैकीं बहुतेक यंत्रसामुग्री देशांतच तयार केल्यास तें आपल्या फायद्याचेंच ठरेल.

साखर कारखान्यास लागणारी सर्व यंत्रसामुग्री कोणाहि एका भारतीय कारखानदारास तयार करणें आणि तिचा पुरवठा करणें शक्य नसल्यानें एक मध्यवर्ति संघटना स्थापन करणें इष्ट आहे. सदर संघटना यंत्रांचे संपूर्ण नमुने देऊं शकेल आणि देशांतील उत्पादनाच्या सर्व सवलती एकत्रित करून यंत्र-सामुग्रीचा पुरवठा करील आणि परदेशांत मागण्या नोंदवून अपरिहार्य यंत्रांचा पुरवठाहि ही संघटना करील.

सदर संघटनेस तांत्रिक सल्ला व साह्य देऊं शकेल अशा प्रकारच्या साखर यंत्रसामुग्रीची निर्मिती करणाऱ्या एका प्रमुख परदेशी फर्मच्या सहकार्यानें ही संघटना स्थापन करण्यांत येईल. या दृष्टीनें नजिकच्या भविष्यकाळांत योग्य ती उपाय-योजना केली जाईल अशी आशा आहे.

---

**अणुशक्तीवर चालणारी पाणबुडी**—अमेरिकेनें बन-विलेल्या, अणुशक्तीवर चालणाऱ्या पहिल्या पाणबुडीनें २६,२३१ मैलांचें भ्रमण पहिल्या प्रथम घेतलेल्या जळणावरच केलें; तिला पुन्हां जळणाचा सांठा घ्यावा लागला नाहीं. ह्यापैकीं १३,१४० मैलांचा प्रवास तिनें पाण्याखालून केला. आपल्या परिभ्रमणांत ह्या बोटीनें एकदां सतत ८ दिवस व १४ तास न थांबतां मार्गक्रमण केलें.

## अमोनियम सल्फेटचा पुरवठा

### बँकेची हमी स्वीकारण्यांत येणार

पुण्यापलीकडे ज्या भागांत मीटर गेज रेल्वेची सोय असेल त्या भागांत हंगामापूर्वी वेळेवर मोठ्या प्रमाणावर अमोनियम सल्फेटची वाहतूक व्हावी म्हणून मुंबई सरकारनें हें खत बँकांच्या हमीवर पुरविण्याचें ठरविलें आहे. ही हमी शेड्यूल्ड बँकांकडून, मुंबई राज्य को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडकडून अथवा रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज यांनीं शिफारस केलेल्या इतर को–ऑपरेटिव्ह बँकांकडून देण्यांत आली पाहिजे. बँकेच्या हमीबाबतचे फॉर्म आणि रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् यांनीं मान्यता दिलेल्या बँकांचीं नांवें संबंधित जिल्ह्याचे जिल्हा शेतकी अधिकारी, सातारा आणि धारवाड डिव्हिजनांचे डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् यांच्याकडे अथवा शेतकी आणि जंगल खातें, सचिवालय, मुंबई, यांच्याकडे अर्ज केला असतां मिळूं शकतील.

१९५६ सालीं अमोनियम सल्फेटचें वांटप करण्यासंबंधींच्या योजनेच्या अन्वयें अमोनिअम सल्फेट मागवूं इच्छिणाऱ्यांना सरकार बरोबर करार करावा लागेल.


जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च १९५६ या तीन महिन्यांत जेवढा माल हवा असेल त्याबद्दल ठराविक फॉर्मवर आपली मागणी नोंदवावी लागते. अशी मागणी नोंदविण्यापूर्वी त्यांना प्रत्येक महिन्यांत जेवढा माल हवा असेल त्या मालाबद्दल टनामागें ५० रुपये या दरानें आगाऊ पैसे भरावे लागतात आणि सदरहू माल एप्रिल, १९५६ पासून वांटण्यासाठीं राखून ठेवण्याकरितां पाहिजे आहे असें स्पष्टपणें कळवावें लागतें. अशा रीतीनें नोंद झाल्यावर जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्चमध्यें माल पाठविण्यांत येईल आणि मालाची बाकी असलेली किंमत बँक गॅरेंटीमध्यें नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल तर ती वसूल न करतां संबंधित जिल्हा शेतकी अधिकारी संबंधित व्यापाऱ्यांना रेल्वे रशीदी देतील. मालाची उरलेली किंमत या व्यापाऱ्यांनीं जास्तींत जास्त पांच हप्त्यांनीं ३० जून, १९५६ पर्यंत दिली पाहिजे. एप्रिल १९५६ पासून पुढें मालाच्या बाबतींत बँकांच्या हमीची सवलत मिळणार नाहीं. कारण, तो संबंध माल चालू खपासाठींच असेल.

अमोनिअम सल्फेटचे दर कमी केल्यास भारत सरकारनें मुंबई सरकारला रिबेट देण्याचें मान्य केलें तर व्यापाऱ्यांनाहि, ज्या दिवशीं अशा रीतीनें मुंबई सरकार दर कमी करील त्या दिवशीं त्यांच्याकडे बँकेच्या हमी पद्धतीनुसार घेतलेला जो माल शिल्लक असेल त्या मालावर हा रिबेट देण्यांत येईल.

---

**अणुशक्तीचें औद्योगिक युग**—सोव्हिएट रशिआंत अणुशक्तीवर आधारलेले नवें औद्योगिक युग सुरू झालें आहे, असा दावा "प्रवदा" ह्या रशियांतील वृत्तपत्रानें केला आहे. समाजवादी अर्थव्यवस्था आणि भांडवलदारी अर्थव्यवस्था ह्यांच्यांत चालू असलेल्या स्पर्धेंत अखेर समाजवादी अर्थ-रचनेचा विजय ठेवलेलाच आहे, असें मतहि पत्रानें व्यक्त केलें आहे.

**मोटारींचें उत्पादन कमी केलें**—अमेरिकेंतील जनरल मोटर्स व क्रिसलर ह्या दोन मोठ्या कारखान्यांनीं मोटारींच्या उत्पादनांत कपात करण्याचें ठरविलें आहे. मागणी व उत्पादन ह्यांच्यांत समतोलपणा राखण्यासाठीं क्रिसलर कारखान्यानें उत्पादन १० टक्क्यांनीं कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. जनरल मोटार्स ४,२०० कामगारांना कामावरून काढून टाकणार आहे.



# कॉसमॉस बँकेचा सुवर्णमहोत्सव

## बँकेचें अभिनंदन

दि. १८--१-१९०६ रोजीं दि कॉसमॉस को. क्रेडिट सोसायटी लि. ही पुणें जिल्ह्यांतील दुसरी सहकारी संस्था नोंदली गेली. तिचें पुढें दि कॉसमॉस को. अर्बन बँक लि. मध्यें रूपांतर झालें. १९२० सालीं कॉसमॉसनें प्रथमच 'अ' वर्ग मिळविला, तो 'अ' वर्ग सुवर्णमहोत्सवापर्यंत, सतत ३५ वर्षें तिनें टिकविला आहे. कॉसमॉसनें मध्यमवर्गाची उत्कृष्ट सेवा बजावली आहे, आणि एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सहकारी कार्यक्षेत्रास नवे नवे कार्यकर्ते पुरविण्याचें कार्य ही बँक करीत आली आहे. १९१७ सालीं पुणें सें. को. बँकेची स्थापना कॉसमॉसच्या जागेंतच झाली, तिचे पहिले पगारी मॅनेजर कॉसमॉसनेंच पुरविले. सेंट्रल बँकेचे इतरहि अधिकारी कॉमसॉसचेच कार्यकर्ते होते व आहेत, आणि सेंट्रल बँकेच्या कित्येक अध्यक्षांना कॉसमॉसच्या अध्यक्षपदाचा किंवा संचालकपदाचा अनुभव उपयोगी पडलेला आहे. कॉसमॉसचे एक भूतपूर्व कार्याध्यक्ष, श्री. दा. वा. पोतदार हे तर रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम विभागाच्या डायरेक्टर बोर्डाचे सभासद झाले आहेत. अशा रीतीनें, कॉसमॉसनें सहकारी चळवळीची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशी बहुमोल सेवा केली आहे. आणखी एक नवी इमारत बांधण्याची योजना बँक आंखीत आहे व शाखा उघडण्याचा विचारहि चालू आहे. कॉसमॉस बँकेच्या सुवर्णमहोत्सवाचे निमित्तानें आम्हीं तिचें व तिच्या नव्या-जुन्या चालकांचें अभिनंदन करतों व तिचें हें स्थान नव्या काळांतहि डौलानें टिकून राहो, असें चिंतितों. —संपादक

### बँकेच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष

## श्री. जेजुरीकर ह्यांचें प्रास्ताविक भाषण

सहकारी चळवळीच्या बाबतींत कै. न. चिं. केळकर, कै. गो. कृ. देवधर, कै. प्रो. वा. गो. काळे, प्रा. धनंजयराव गाडगीळ, श्री. दा. वि. गोखले, श्री. न. वि. गाडगीळ, श्री. बापूसाहेब गुप्ते प्रभृतींनीं एक विशिष्ट परंपरा उत्पन्न केलेली आहे. कारण, राजकीय वार्बीसारख्या अन्य चळवळींत मतभेद असतांनासुद्धां, सहकारी चळवळीच्या बाबतींत कोणत्याहि कार्यकर्त्यानें त्याची झळ ह्या चळवळीला लागू दिली नाहीं, हें ह्या ठिकाणीं त्यांच्या-बद्दल कृतज्ञता व्यक्त करून, नमूद करणें अवश्य आहे. त्यांचें उदाहरण सतत डोळ्यांपुढें ठेवून हल्लींचे कार्यकर्ते आपलें काम करीत असल्यामुळें, बँकेच्या कामांत अगर तिच्या प्रतिष्ठेंत कोणतेंहि न्यून सांपडणार नाहीं, असा मला विश्वास आहे.

बँकेला आज पन्नास वर्षें पूर्ण होत आहेत. बँकेची स्थापना, जोपासना व तिची हल्लींची प्रतिष्ठा लक्षांत घेतां कॉसमॉस बँक मानाचें व डौलाचें जीवन जगत आहे, असें म्हणण्यास मला अभिमान वाटत आहे. मानवी जीवन जरी क्षणभंगुर असलें, तथापि संस्था ह्या दीर्घकाल चालू राहिल्या पाहिजेत आणि म्हणून कॉसमॉस बँकेची उत्तरोत्तर भरभराट होवो अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

### समारंभाचे अध्यक्ष

## प्रा. द. गो. कर्वे ह्यांचें भाषण

सहकारी मंडळया आपल्या देशांत नवीनच होत्या तेव्हां-पासून आतांपर्यंत कार्यक्षमतेनें व उत्साहानें प्रगतीचा मार्ग चालत रहाणें ही विशेष कौतुकाची व अभिमानाची बाब होय. या प्रसंगीं आपणां सर्वांस कृतार्थतेचें समाधान वाटणें योग्य आहे.

आज पस्तीस वर्षें मंडळीनें सरकार तपासणींत "अ" वर्ग कायम ठेवला आहे. ह्या एका गोष्टीवरून देखील कार्यकर्त्यांच्या कार्यक्षमतेची साक्ष पटणार आहे. मितव्ययाचा प्रसार करण्या-करितां काढलेल्या संस्थांचा कारभार मितव्ययी असावा, ही अपेक्षा



स. वा. कुलकर्णी
अध्यक्ष—कार्यकारी मंडळ



ग. न. जेजुरीकर
अध्यक्ष—सल्लागार मंडळ



य. श्री. शाळिग्राम
कार्यवाह

ह्या संस्थेंत पूर्ण झालेली आढळते. सन्मान्य अगर पगारी कार्यकर्ते ह्या नात्यानें ह्या मंडळींत कामास सुरवात करून ज्यांनीं सहकार्याच्या विस्तृत क्षेत्रांत पुढें भरीव कामगिरी केली अशा अनेक कार्यकर्त्यांची जी यादी वृत्तांतांत दिली आहे ती कोणत्याहि संस्थेस अभिमान वाटावा अशीच आहे. त्यांपैकीं अनेकांशीं सहकारी या नात्यानें माझा प्रत्यक्ष संबंध आला आहे. आजहि त्यांतील कांहीं सद्गृहस्थ व मी सहकारी संस्थांत काम करीत आहों. सहकाराच्या तत्त्वाबद्दल पूर्ण निष्ठा, व्यावहारिक अनुभवाचे पायावर उभारलेली मतप्रणालि व अंगावर घेतलेल्या कामास लागणारा उद्योग करण्याची चिकाटी, ह्या तिन्ही गुणांत ते सर्व कार्यकर्ते ठळकपणें सर्वांच्या नजरेंत येतात. हे गुण ह्या संस्थेंत वाढीस लागले असल्यानें त्यांच्याहि कार्यांत ह्या संस्थेचा स्पृहणीय भाग आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

तत्त्वनिष्ठा व कार्यनिष्ठा हे गुण आग्रहानें प्रकट केले, तरी सहकार्याचें व मैत्रीचें वातावरण ठेवणें शक्य आहे, असा अनुभव ह्या मंडळीच्या इतिहासांत दिसून येतो. ह्या संस्थेंत अनेक कठीण व कसोटीच्या प्रसंगीं सभासदांनीं खरी सहकारी वृत्ति दाखविल्याचें इतिवृत्तांत नमूद आहे. ह्या कांहींशा दुर्मिळ परंतु आवश्यक गुणाबद्दलहि संस्थेच्या आजी व माजी सभासदांचें अभिनंदन करावयास पाहिजे.

अलीकडे आपल्या देशांत जुन्या पद्धतीच्या, म्हणजे सर्वत्र अमर्यादित व्यक्तिस्वातंत्र्य आणि भांडवलशाही जारी होती त्या वेळच्या, सहकारी कार्यपद्धतीच्या ऐवजी आर्थिक नियोजनाच्या आणि सामाजिक समतेच्या कक्षेंतील सहकारी संस्थांची प्रथा पडत आहे. ती ह्या नव्या सामुदायिक जीवनाचीच द्योतक होय. ह्या युगांत कॉसमॉससारख्या संस्थांना सहाजिकपणें करतां येण्यासारख्या निदान दोन तरी कामगिऱ्या आहेत. कमी उत्पन्न असलेल्या नागरिकांची घरगुती अडचण दूर व्हावी ह्या ज्या भावनेनें कॉसमॉस मंडळी निघाली, त्याच भावनेचा वाढता आविष्कार म्हणजे विविध वस्तूंचें सहकारी विक्रयालय, आणि निवासस्थानांच्या सहकारी वसाहती ह्या होत. कॉसमॉसची घटना व भांडवल ह्यांचा अशा योजनांत कितपत व कसा उपयोग होईल हा प्रश्न निराळा. परंतु कॉसमॉसच्या मंडळींची भावना, अनुभव आणि कर्तबगारी यांचा अशा तऱ्हेच्या प्रगतीस पुष्कळच उपयोग होणार आहे. योजनामय आणि समतानिष्ठ घटनेंतहि स्वातंत्र्य टिकवावयाचें असेल, तर सहकारी संस्थांनीं सामाजिक जबाबदाऱ्यांत पूर्ण भागीदारी स्वीकारणें आवश्यक आहे.

विविध वस्तुभांडार व निवासस्थानांच्या वसाहती ह्या बाबतींत आतांपर्यंत झाली त्याहून फार मोठ्या प्रमाणावर आतां खटपट झाली पाहिजे. सामान्य शहरी नागरिक व कल्याणकारी सरकार ह्या दोहोंनाहि ह्या गोष्टींची सध्यां फार जरूरी आहे. ज्या निःस्वार्थ बुद्धीनें व दूरदृष्टीनें कॉसमॉसचे संस्थापक पन्नास वर्षांपूर्वी सहकारी मंडळी स्थापण्यास पुढें सरसावली, त्याच हिंमतीनें व निष्ठेनें आपले आजचे सहकारी कार्यप्रवृत्त झाले तर आपल्या काळच्या सामाजिक गरजा भागविण्यास आपण मदत केली असें होईल. त्याचप्रमाणें, राष्ट्रीय नियोजनाच्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कार्यास आपण हातभार लावला असेंहि होईल. आजच्या ह्या आनंदाच्या प्रसंगीं कॉसमॉसचे सभासद व त्यांचे हितचिंतक ह्यांचें अभिनंदन करतांना, त्यांच्या हातून चालू काम व त्याचबरोबर नव्या काळास साजेशी विविध क्षेत्रांतील भरीव कामगिरी पार पडेल, अशी मी खात्री बाळगतों.

---

## छोट्या उद्योगधंद्यांना मिळणारीं कर्जें

मुंबई राज्यांतील छोट्या उद्योगधंद्यांना व ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकार कर्जें देत असतें. ह्या कर्जाच्या अटी आतां अधिक सैल करण्यांत आल्या आहेत. आतांपर्यंत ५०,००० रुपयांपेक्षा अधिक नसलेल्या कर्जावर दरसाल दरशेकडा ५ टक्के व्याज घेण्यांत येत असे. आतां हा दर ३ टक्क्यांवर आणण्यांत आला आहे. ५०,००० रुपयांच्यापेक्षा अधिक रकमेचीं कर्जें जे छोटे कारखानदार घेतील त्यांना मात्र पूर्वीप्रमाणेंच ५ टक्के दरानें व्याज भरावें लागेल. त्याचप्रमाणें कच्चा माल, अर्धवट तयार झालेला व पक्का माल आणि धंद्यांतील व्यापार-व्यवहारांत गुंतलेला माल ह्यांच्या तारणावरहि कर्जें देण्यांत येतील. यंत्रसामुग्री अगर इतर साहित्य ह्यांच्या खरेदीसाठीं कर्ज घेण्यांत आलें असेल तर तें परत करण्याचा काळ १० वर्षांपर्यंत असूं शकेल. तथापि, अशा कर्जांपैकीं जी रक्कम खेळतें भांडवल म्हणून वापरली जाईल तिच्या परतफेडीचा काळ मात्र ५ ते ७ वर्षांपेक्षा अधिक असणार नाहीं. छोट्या धंदेवाल्यांना १,००० रुपयांपर्यंत कर्जें पाहिजे असतील तर तीं व्यक्तिशः बॉंड लिहून देऊन मिळवितां येतील. मात्र त्यासाठीं सरकारमान्य अशा सामाजिक संघटनांनीं त्यांची शिफारस केलेली असली पाहिजे. तथापि, धंद्यासंबंधींच्या आर्थिक बाबी व जरूर तो माल निर्माण करण्याची धंदेवाल्याची पात्रता ह्या गोष्टींचा विचार करूनच कर्जें दिलीं जातील. एक अगर अधिक जामीन देऊन ५,००० रुपयांपर्यंतचीं कर्जेंहि लहान औद्योगिक घटकांना मिळूं शकतील. असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ह्यांना १,००० रुपयांपर्यंतचीं कर्जें देण्याची शिफारस करण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. मध्यवर्ती संघटना, इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह बॅंक्स व स्टेट को-ऑपरेटिव्ह बॅंक्स ह्यांना ते शिफारसी करूं शकतात.

---

**इंदूरमधून गोठ्यांची हकालपट्टी**—मध्य भारत सरकारनें इंदूर शहरांतील गुरांचे गोठे हलवून ते शहरापासून २५ मैल दूर असलेल्या सिमरोल ह्या गांवीं नेण्याचें ठरविलें आहे. दुधाचा धंदा करणारे जे मालक गोठे हलविण्यास तयार असतील त्यांना मदत करण्यासाठी म्हणून सरकार १ लाख रुपयांचीं कर्जेंहि देणार आहे. शहरांतील गुरांचा उपद्रव कमी होऊन गोठे अधिक निरोगी रहावेत म्हणून हा उपक्रम करण्यांत येत आहे.

तमाम दंतरोगांवर

☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.